**मे. सुपर्ब हायजेनिक डिस्पोजल, शिट नं. ६५, सी. एस. नं. १०१०, ख. न. १३३, मौजा भांडेवाडी, जि. नागपुर येथील ५०० किलो/तास आणि ३०० किलो/तास क्षमतेचे २ इन्सिनरेटर जोडून कॉमन बायो मेडिकल वेस्ट ट्रीटमेंट आणि डिस्पोजल फॅसिलिटी (CBWTF) चा प्रस्तावित विस्तार टप्प्याटप्प्याने, ६००० लिटर/दिवस क्षमतेचे ऑटोक्लेव्ह आणि २५० किलो/तास क्षमतेचे श्रेडर चे प्रस्तावित प्रकल्प विस्तारीकरण घेण्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत....**

---

मे. सुपर्ब हायजेनिक डिस्पोजल, शिट नं. ६५, सी. एस. नं. १०१०, ख. न. १३३, मौजा भांडेवाडी, जि. नागपुर येथील ५०० किलो/तास आणि ३०० किलो/तास क्षमतेचे २ इन्सिनरेटर जोडून कॉमन बायो मेडिकल वेस्ट ट्रीटमेंट आणि डिस्पोजल फॅसिलिटी (CBWTF) चा प्रस्तावित विस्तार टप्प्याटप्प्याने, ६००० लिटर/दिवस क्षमतेचे ऑटोक्लेव्ह आणि २५० किलो/तास क्षमतेचे श्रेडर चे प्रस्तावित प्रकल्प विस्तारीकरण घेण्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीकरिता प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ, शिट क्र. ६५, सी. एस. नं. १०१०, ख. न. १३३, मौजा भांडेवाडी, जि. नागपुर येथे संपन्न झाली.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ०६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता, मे. सुपर्ब हायजेनिक डिस्पोजल, शिट नं. ६५, सी. एस. नं. १०१०, ख. न. १३३, मौजा भांडेवाडी, जि. नागपुर येथे घेण्याकरीता मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई-१०९/२०२४ पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२४०११७-FTS-०१२५ दि. १७/०१/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, नागपुर - अध्यक्ष प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपूर - सदस्य, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ समन्वयक. **(सहपत्र-१)**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीची सुचना भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी मराठी वृत्तपत्र नवराष्ट्र व इंग्रजी दैनिक हितवाद या वृत्तपत्रात जाहीर जनसुनावणीची प्रसिध्दी ३० दिवस आधी दि. ०५ जानेवारी २०२४ रोजी देण्यात आली होती. **(सहपत्र-२)**

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीकरीता मा. सचिन गोसावी, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर तथा अध्यक्ष, जनसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, मा. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा सदस्या जनसुनावणी समिती, श्री. राजेंद्र उ पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक जन सुनावणी समिती, ग्रामस्थ, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते. या बाबतचे हजेरी पट सोबत जोडत आहे. **(सहपत्र क्रं ३)**

**<u>कार्यपध्दती व उद्देश :</u>**

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते यांचे हार्दिक स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची प्रक्रिया सरु केली. समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र जसे मराठी वृत्तपत्र दैनिक नवराष्ट्र व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र हितवाद ३० दिवस आधी दि ०५ जानेवारी २०२४ रोजी देण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना,विचार टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविण्याचे जनतेला व पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच प्रस्तावित मे. सुपर्ब हायजेनिक डिस्पोजल, शिट नं. ६५, सी. एस. नं. १०१०, ख. न. १३३, मौजा भांडेवाडी, जि. नागपुर येथील ५०० किलो/तास आणि ३०० किलो/तास क्षमतेचे २ इन्सिनरेटर जोडून कॉमन बायो मेडिकल वेस्ट ट्रीटमेंट आणि डिस्पोजल फॅसिलिटी (CBWTF) चा प्रस्तावित विस्तार टप्प्याटप्प्याने, ६००० लिटर/दिवस क्षमतेचे ऑटोक्लेव्ह आणि २५० किलो/तास क्षमतेचे शेडर चे प्रस्तावित प्रकल्प विस्तारीकरण घेण्याच्या प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडाचा मसुदा, कार्यकारी सारांशच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी स्थानीक मराठी भाषेत व इंग्रजी भाषेत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता खालील अधिसूचित स्थानिक कार्यालये व ग्रामपंचायती येथे उपलब्ध करण्यात आले आहेत.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

२. जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर

३.जिल्हा परिषद, नागपूर

४.उप-विभागीय कार्यालय, नागपुर, जि.नागपूर

५. तहसिल कार्यालय, नागपुर, ता. नागपुर, जि.नागपूर

६.प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

७.पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ व मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

८. मप्रनि मंडळ (मुख्यालय), शिव सर्कल, शिव (पुर्व), मुंबई-२२.

९.आयुक्त कार्यालय, नागपुर महानगरपालिका, नागपुर, जि.नागपूर.

१०.ग्रामपंचायत कार्यालय बीडगाव, वाठोडा, भांडेवाडी, तरोडी, ता.नागपुर, जि.नागपूर.

वरील नमुद अधिसुचित शासनाच्या विभागाला देखील त्यांनी त्याच्या स्तरावर सदरहु पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची बाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अश्या प्रकारे जाहीर जनसुनावणी बाबद अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पदधतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्प बाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टिका, टिप्पणी, सुचना व आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोयीचे होईल.

सदरहु जाहिर जनसुनावणीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ यांना लेखी तथा ईमेल व्दारे एकही सुचना प्राप्त झालेल्या नाही.

सदरील समिती ही फक्त लोकांचे सदरील प्रकल्पाबाबतचे मत नोंदविण्याकरीता असुन कोणालाही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नाही. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुददयांचा व प्रकल्प धारकांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन बैठकिचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्रधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करण्यात येईल.

सदरील प्रकल्पाविषयाच्या कोणालाही लेखी निवेदन/सुचना /हरकती घ्यावयाचे असल्यास त्यांनी प्रकल्प धारकांचे सादरीकरण केल्यानंतर आपले नाव, गावाचे नाव सांगुन प्रश्न, सुचना, हरकती, विचारु शकताता या प्रश्न उत्तराच्या कार्यवाहीची नोंद जशीच्या तशी घेऊन या जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील.

समन्वयक, यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत प्रकल्पा संबंधिची पर्यावरण अनुमतीच्या प्ररतावाकरीता पर्यावरण विषयक जनजाहीर सुनावणीची सादरीकरण करण्याची सुचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रमुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

**प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती**

- प्रकल्पाचे भौगोलिक स्थान
- जनसुनावणीचा तपशिल
- प्रकल्प प्रवर्तक तपशिल
- प्रकल्पविषयीच्या ठळक घडामोडी
- प्रकल्पाची माहिती
- सीपीसीबी (CPCB) मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्प ठिकाण निवडीचे निकष
- पर्यावरणविषयक तपशिल आणि प्रकल्प ठिकाण तपशिल
- प्रकल्प विस्तारीकरणाची गरज
- प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाची वैशिष्ट्ये
- पर्यावरणविषयक तपशिल आणि प्रकल्प ठिकाण तपशिल
- प्रकल्प स्थळ छायांचित्र
- मागणी पुरवठा तफावत
- जैववैदयकीय कचरा प्रमाणीकरण तपशिल
- एकुण जैववैदयकीय कचरा निर्मितीचा तपशिल
- जैववैदयकीय कचरा संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचे तपशिल
- जैववैदयकीय कचरा प्रक्रियेमधील सयंत्राचा तपशिल
- जैववैदयकीय कचरा प्रक्रियेचा तपशिल
- प्रस्तावित विस्तारीकरणाअंतर्गत सयंत्रे
- सीपीसीबी मार्गदर्शक तत्वानुसार इंन्सिनरेटर
- जैव-वैद्यकीय कचरा वर्गवारी जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नियम
- औदयोगिक आणि घरगुती उददेशासाठी पाण्याचा वापर
- औदयोगिक आणि घरगुती सांडपाणी निर्मिती
- सध्याची ई.टी.पी. (क्षमता १० घन मी/दिन) व प्रस्तावित ई.टी.पी. (क्षमता ५० घन मी/दिन)
- प्रस्तावित एस.टी.पी. (क्षमता ५ घन मी/दिन)
- प्रदुषणाचे स्त्रोत
- इन्सिनरेटर स्टॅक उत्सर्जन निरीक्षण
- दुर्गंधी नियंत्रण आणि त्याचे व्यवस्थापन
- हरीतपटटा विकास कार्यक्रम व आराखडा
- सध्याच्या व प्रस्तावित वृक्षाची यादी
- नियोजित सामाजिक व आर्थिक विकास
- प्रकल्पामधील पर्यावरण व्यवस्थापन गुंतवणुकीचा तपशिल
- पर्यावरणविषयक तपासणी कार्यक्रम

- उपग्रह नकाशा
- स्थलाकृतिक नकाशा
- स्थान नकाशा
- LULC नकाशा
- सेटलमेंट नकाशा
- ड्रेनेज नकाशा
- Windrose (निरीक्षण कालावधी: मार्च - एप्रिल - मे - २०२३)
- हवेची गुणवत्ता
- भुपृष्ठीय पाण्याची गुणवत्ता
- भुगर्भिय पाण्याची गुणवत्ता
- मातीची गुणवत्ता
- प्रकल्प परीसरातील जैव विविधता (अभ्यास क्षेत्रातील जैवविविधता)
- प्रकल्प परीसरातील जैव विविधता (अभ्यास क्षेत्रातील अधिवास)
- सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण
- प्रभाव आणि कमी करण्याच्या उपायांचे मूल्यमापन

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक गठीत जनसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

## जनसुनावणी नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे | प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली प्रतिक्रिया /उत्तर | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|---|
| १ | **श्री. शेखर दाते, ग्रामस्थ, गाव - तरोडी यांनी असा मुदद‌ा उपस्थित केला कि,** कंपनी मधुन निघणाऱ्या सांडपाणी याचे काय होईल ? | **प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सुचविले की :-** जे सांडपाणी व्हेईकल वॉशिंग, इक्युपमेंट वॉशिंग व फलोअर वॉशिंग मधुन निर्माण होणार आहे ते पुर्णपणे ट्रीटमेंट करुन त्याचा पुर्नवापर करणार आहोत. हे प्रकल्प ZLD प्रकल्प आहे व CPCB मानकाप्रमाणे असणार आहे. त्याचा एकही थेंब बाहेर जाणार नाही. | |
| २ | **श्री. नारायण गायकवाड, ग्रामस्थ, गाव-बीडगाव यांनी असा मुददा उपस्थित केला** कि, माझा या प्रकल्पाला विरोध | **प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सुचविले की :-** जो बेसमेंट डाटा कलेक्ट केला आहे. त्याव्दारे जो इम्पॅक्ट येतो आहे त्यामध्ये आमची स्वत:ची काय एक्टीव्हिटी आहे यामध्ये एअर, वॉटर, | **जन सुनावणी समिती सदस्या यांनी सांगितले की,** इथे तुम्हाला जे प्रजेंटेशन दिले आहे, प्रकल्पाबददल काय अभ्यास केला आहे, आजुबाजुचे सर्व सांगितले आहे, या प्रकल्पाबाबत तुम्हाला पण काही वाटते का, |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाही पण आमच्या मुलांना नोकरी मिळेल काय ? | नॉइस पोलुशन कंप्लीट करुन ते एम. एस. डब्लुचे असेल किंवा आमच्या स्वत:च्या इंन्सीनरेटरचे असेल किंवा आजुबाजुची कारखान्याची किंवा रस्त्यावरील ॲक्टीविटी असेल यामध्ये ते कव्हर झाले आहे. असे त्याचे इटरपिटेशन झाले आहे. | की कोणत्या गावाचा उल्लेख नाही आहे, वस्तीचा उल्लेख नाही आहे, त्यानुसार शहर व नागपुर शहराची जे लोक वस्ती आहे. महनगरपालिकेच्या इतर प्रकल्प या कोणताही उल्लेख या प्रजेनटेशन मध्ये आलेले नाही याबाबत थोड सांगण्यात यावे.<br>इटरपिटीशन आहे पण जेव्हा तुम्ही लोकेशन दिले त्यावेळेस लॅण्ड लिज पॅटर्न तो दिलेलाच नाही. काय आहे हा प्रोजेक्ट. त्यांचा आजुबाजुचा लॅड लिज पॅटर्न काय आहे आणि अकॉरडींगली इम्पॅक्ट हा चेंज होणार आणि आपल्याला ज्या फॅसीलीटी आहे ते अकॉरडींगली करायला पाहिजे. त्याचा इथे काहीच उल्लेख नाही आहे. तुम्ही त्याच्या बददल जास्त विस्तारीत केल आणि ते राहायला पाहिजे होत. कि लोकांना ही कळेल की हे काय आहे. जो होणार आहे क्युमीलीटी इफेक्ट होणार आहे याचा विचार करा. प्राजेक्टच्या आजुबाजुचा लॅड युज पॅटर्न दिलेला नाही. अकॉडींग दॅट मॅटर याचा अलॉट उल्लेख केलेला नाही. त्याचा फायनल ईआयए मध्ये उल्लेख करा. त्यामुळे लोकांना कळेल.<br>**जन सुनावणी समिती अध्यक्ष तथा अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी, यांनी सुचना केली की,** आपणाला सगळयाना पी.पी.टी व्दारे माहिती दिली आहे. आपण एखादया वेळेस बघतो की, कोणताही प्राजेक्ट तयार होत असतांना जे काही नॉर्मस आहे त्या पदधतीने सगळया गोष्टी अपेक्षीत असते त्याचा हा एक भाग आहे. ही एक पब्लीक हीअरींग आहे इथे तुम्हाला बोलावले आहे की तुमचे मत काय आहे, तुमची तक्रार काय आहे काही सजेशन, काही अडचण याबबदल आपण लोकांचे मत ऐकुण घेण्यासाठी पब्लीक हिअरींग ठेवली आहे. बरेचदा आपण अनुभवतो की पब्लीक हिअरींग होतात, संपुण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्राजेक्ट मंजुर होतो आणि त्यानंतर प्रकल्प कसा बंद पडेल या दृष्टीने कामे केली जातात मग अस न होता आपला जो काही टप्पा आहे, ज्या काही कोणाच्या अडचणी असतील या आजुबाजुच्या ग्रमपंचायत आहे, महानगरपालीका क्षेत्र आहे. सर्वानी काय त्याचे अडचणी असतील त्यासगळया लेखी स्वरुपात किंवा तोंडी स्वरुपात विचारु शकता, एकदा हिअरींग झाली, हिअरींग मध्ये कोणी विचारत नाही काय नाही त्यानंतर पुन्हा तक्रारी वर तक्रारी आणि त्यानंतर प्राब्लेम क्रिएट होतात. म्हणुन सर्वाना विनंती आहे की, आता आजुबाजुच्या ग्रमपंचायतला प्रसिदध केलेले आहे आणि इतरही प्रोसेस केले आहे व पेपर मध्ये ही प्रसिदध केलेल आहे आणि जे काही मेनमेन ऑफीस आहे, जिल्हा कार्यालय, महानगरपालीका इथे पब्लिक हिआरींगच्या सुचना प्रसिदध केल्या आहे. त्याच्या अनुशंगाने जे काही पद अधिकारी असतील जे काही गावातील लोक असतील त्यांनी या हिअरींग मध्ये भाग घेऊन आपला जो काही प्रकल्प एक्सटेंशन होत आहे त्याबददल आपल काय मत आहे ते दिलखुलास विचारल पाहिजे कारण याचे नावच पब्लिक हिअरींग आहे. कारण अश्या कोणत्याही प्रकरच्या शंका, कुशंका, गैरसमज मनात न ठेवता प्रत्येकाने पुढे येऊन जे काही वाटत आहे या प्रकल्पाबाबत एक्सटेंशन करण्याबाबत काही अडचणी असतील ते पुढे येऊन विचारावे व आपले मुददे क्लिअर करावे. |
| ३ | • **आकाश पावडे, विदयार्थी, पॉलटेक्निक इलेक्ट्रिकल इंजिनिअर, यांनी असा मुददा उपस्थित केला कि,** प्लांट मध्ये वायु | • वायु प्रदुषण २ प्रकारे होणार असतात आमच्याकडे स्टॅक आहे प्लांट मध्ये चिमणी ही इन्सीनरेटरला जोडलेली आहे त्यामध्ये वेस्ट जाळतांना त्यातुन ऑक्साईड ऑफ नायट्रोजन, सल्फर डाय | |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रदुषण आणि ध्वनी प्रदुषण तुम्ही कसे कंट्रोल करणार आहात.<br><br>• हा प्रोजेक्ट येत आहे त्यामुळे आम्हाला जागा राहातील काय. | ऑक्साईड, पीएम पार्टीकल्स तयार होते. व त्या वेट स्क्रबर, चीलर, या यंत्रणेव्दारे कट्रोल केली जाते इंसीनरेटर मध्ये वेस्ट जाळतांना त्याचे तापमान ७०० व ८०० डिगरी सेल्सीअस असते व चिमणीमधुन निघणार गॅसेसचे टेंपरेचर १०० ते ११० असते. So2 तसेच perticular matter करीता ७० ते १०० फुट उंच बसविलेली चिमणी आहे त्यामुळे PM चा डिसपरशन उंचीवर झाल्यामुळे वायु प्रदुषणाचा त्रास या परीसरात होणार नाही व दुसरी गोष्ट म्हणे ध्वनी प्रदुषणाबाबत मोठया प्रमाणात आवाज होणार नाही, ५५ ते ५० डेसीबल पर्यंत राहील इंड्रस्टीज ची ७५ डेसीबल पेक्षा बाहेर जाणार नाही. जसेजसे तुम्ही दुर जा तसे त्याचा आवाज कमी होतो. ग्रीन कव्हर आहे त्याला मदत होईल. आणि आम्हाला नॉइस कंट्रोल करायला आणखी मदत होईल.<br><br>• हो आम्हाला ८० स्टाफची गरज राहील, त्यांची शैक्षणिक पात्रता बघुन जागा भरण्यात येईल. त्यांना पहिले ट्रेनिंग देईल मग त्यांचा विचार करण्यात येईल, त्यामुळे स्वताची व समाजाचा विचार करुन प्रोजेक्ट प्रपोनंट विचार करतील. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | • कामगार काम करीत असतांना इजा झाली तर काही सुविधा आहेत का? | • हो हा प्रश्न औदयोगिक सुरक्षामध्ये येतो. कामगारासाठी काही सुरक्षा नियम बनलेले आहेत. त्यांनी ते फॉलो केले पाहिजे उदाहरण सेफटी शुज आणि हेल्मेंट, कार करतांना काही अपघात घडला, शॉक लागला तर त्याला लगेच प्राथमिक उपचार देण्यात येईल त्यानंतर त्याला दवाखान्यात पाठविण्यात येईल. आमच्याकडे फायर, ॲम्बुलंस, यांची फॅसीलीटी आहेत. फायरब्रिगेट, गव्हरमेंट हॉस्पीटल, कार्पोरेशनचे सुदधा काही हॉस्पीटल आहे त्याची सुरक्षा घेण्यात येईल. त्यांना लसीकरण करण्यात येते आमची काही प्रायव्हेट हॉस्पीटल आहे आम्ही त्यांना तेथे उपचार करतो. सेफटी प्रोटोकॉल पाळले जातात आणि त्यांना दाखल केले जातात. | |
| ४ | | • **प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगीतले की** - १ एकर जागा लिजवर मिळालेली आहे, एग्रीमेंट झालेल आहे, ईटीपी सध्या १० सीएमडी आहे व पुढे ५० सीएमडी प्रस्तावित आहे. इन्सीनरेटर — ३०० कि. वरुन ५०० कि. केलेले आहे.<br>• प्रोजेक्ट प्रपोनंट नी सांगीतले की अजेंडा करतो. | • **श्री. राजेंद्र पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपुर-१ यांना अस मुददा उपस्थित केला की,** - विस्तारीकरण करीत असतांना तुमच्याकडे बायो मेडीकल वेस्ट कलेक्शन करण्याकरीता कीती गाडी असणार आहे. व त्या व्हेईकील वॉशींगमधुन निर्माण होणाऱ्या सांडपाण्याकरीता किती क्षमतेचा विस्तारीत इटीपी राहणार आहे व सध्या स्थितीत ईटीपी ची किती क्षमता आहे. व त्या प्रक्रियाकृत केलेल्या पाण्याची विल्हेवाट करण्याकरीता पुरेशी जागा आपल्याकडे उपलब्ध आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | का, सदरील विस्तारीत जागा ही आपण भाडेतत्त्वावर घेतली आहे की आपल्या स्वत:च्या मालकीची आहे.<br>• आपल्याकडे १०० % सेग्रीगेशन करीता जागा उपलब्ध आहे का, प्रकल्पाचे विस्तारीकरण होत असतांना जैविक कचऱ्याचे प्रमाण वाढणार आहे त्याकरीता आपल्याकडे पुरेशी जागा उपलब्ध आहे का.<br>• तदनंतर प्रकल्प धारकास सुचना केली की, आपण आपल्या फायनल इआय रीपोर्ट मध्ये आपण प्रकल्पापासुन १० कि. परिघामध्ये केलेल्या हवेच्या, पाण्याच्या व आवाजाच्या प्रत्यक्ष जागेवर केलेल्या पृथ:करणाचे अहवाल फोटो सहीत समाविष्ट करावे. ते आपल्या पर्यावरण आघात मुल्याकन अहवाल व कार्यकारी सारांश मध्ये समावेश केले नाही. |

मा. अध्यक्ष तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की लोकसुनावणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुदद्दे जसे च्या तसे लोकसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये समाविष्ट करुन योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण वने व वातावरणीस बदल, मुंबई, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर करण्यात येईल. त्यानंतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषीत केले.

**(हेमा देशपांडे)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर

**(रा. ऊ. पाटील)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर -१

**(सचिन गोसावी)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर.